आत्मदीपो भव !

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी

Rambhau Mhalgi Prabodhini

# सार्वजनिक उत्सव मंडळ पदाधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण







# सार्वजनिक उत्सव साजरे करणाऱ्या विविध मंडळांच्या पदाधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण शिबिर

## प्रबोधिनीविषयी

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी सुमारे ४२ वर्षे प्रशिक्षण, प्रबोधन आणि संशोधन या त्रिसूत्रीसह प्रामुख्याने राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. सर्व समाज घटकांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी दर्जेदार आणि सकस प्रशिक्षण कार्यक्रम योजते. विविध क्षेत्रांतील संस्था-संघटनांतील कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्यापासून सर्वसामान्य नागरिकांपर्यंत हजारो जणांनी प्रबोधिनीच्या व्यक्तिविकासात्मक प्रशिक्षण कार्यक्रमांतून प्रेरणा घेतली आहे. केशवसृष्टी, उत्तन येथील निसर्गसुंदर, अत्याधुनिक आणि सुसज्ज ज्ञान- नैपुण्य केंद्र हे तर म्हाळगी प्रबोधिनीचे प्रमुख वैशिष्ट्य!

प्रशिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकास आणि क्षमता संवर्धन घडवणारी रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी ही अभिनव संस्था आहे. विविध सांस्कृतिक-सामाजिक-राजकीय विषयांबाबत मान्यवर तज्ज्ञ आणि अनुभवी अभ्यासक यांचे प्रेरक आणि दिशादर्शक मार्गदर्शन हे म्हाळगी प्रबोधिनीचे बलस्थानच आहे.

## पार्श्वभूमी

महाराष्ट्रात विविध धार्मिक उत्सव सार्वजनिक स्वरूपात मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या या उत्सवांच्या काळात आनंदाने भारलेल्या वातावरणाचा अनुभव नागरिकांना येतो. उत्सवांना सार्वजनिक स्वरूप देणाऱ्या लोकमान्य टिळकांसारख्या धुरिणांनी या उत्सवांना 'समाजसंघटन आणि राष्ट्रभक्ती' या मूल्यांशी जोडले. काळाच्या ओघात समाजप्रबोधन, सामाजिक उपक्रमशीलता, समाजसेवा, विविध कलांची सादरीकरणे इत्यादी घटकही या उत्सवांचा महत्त्वाचा भाग बनले.

संबंधित देवतांचे पूजन आणि स्मरण असे 'धर्मकारण' या उत्सवांतून साध्य होतेच, त्याचबरोबर सामाजिक कार्यकर्ता घडण्याचे 'समाजकारणही' साधले जाते. दहीहंडीसारख्या उत्सवातून जिद्द, शौर्य, धैर्य, सहकार्य आदि गुणांचा विकास तरुणांमध्ये होतो. शिल्पकला, संगीत, नृत्य इत्यादी कलांसाठी या उत्सवांतील सादरीकरण हा सर्वांगीण उत्कर्षाचा काळ असतो.

समाजजीवनाचे कोणतेही क्षेत्र असो, त्या क्षेत्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि त्यातील कार्यक्षम मनुष्यबळासाठी 'प्रशिक्षण हा एक महत्त्वाचा घटक' ठरतो. एक उन्नत समाज निर्माण होण्यासाठी उत्सवांना कार्यालयीन कामातील व्यावसायिकता, सार्वजनिक कार्यांतील नियोजनबद्धता आणि सामाजिक व सांस्कृतिक भान अशा अनेक घटकांची जोड देणे गरजेचे असते. अशा प्रकारचे प्रशिक्षण देणारी कोणतीही औपचारिक संस्थात्मक व्यवस्था आज तरी उपलब्ध नाही. या पार्श्वभूमीवर नेमकी गरज लक्षात घेऊन रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी गेली ४२ वर्षे प्रशिक्षण या क्षेत्रात यशस्वीपणे कार्यरत आहे.

## प्रशिक्षणाचे स्वरूप

- वैचारिक, कार्यात्मक आणि कौशल्य विकासात्मक.
- आत्मविश्वास वाढवणारे आणि प्रेरणा व दिशा देणारे.
- सार्वजनिक उत्सवांना अधिक विधायक आणि रचनात्मक स्वरूप प्राप्त होण्यासाठी.
- प्रशिक्षण वर्ग / शिबिरांचा कालावधी – २ किंवा ३ दिवस
- किमान ३५ ते कमाल ५० संख्येचे प्रशिक्षण वर्ग होणे अपेक्षित.

## प्रशिक्षण कोणासाठी

- दहीहंडी, श्री गणेशोत्सव, नवरात्रोत्सव आणि दिवाळीपासून ते कोजागिरी पौर्णिमेपर्यंत उत्सव साजरे करणाऱ्या सार्वजनिक मंडळाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्यासाठी.
- कालसुसंगत, व्यक्तिमत्त्व विकासात्मक प्रशिक्षण घेण्यास उत्सुक असलेल्या सर्वांसाठी

# सार्वजनिक उत्सव साजरे करणाऱ्या मंडळांच्या पदाधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण

## भूमिका

सार्वजनिक मंडळांच्या माध्यमातून अनेक उत्सव सुव्यवस्थितपणे आणि सुनियोजितपणे साजरे करण्याचा प्रघात आहे. अनेक मंडळांचे मोठ्या सामाजिक संस्थांमध्ये रूपांतर झाले आहे. असंख्य मंडळे व संस्था या समाजसेवा आणि समाजसंघटनाच्या प्रभावी माध्यम बनल्या आहेत. भारतीय संस्कृतीचे हे एक आगळेवेगळे वैशिष्ट्य निश्चितच म्हणता येईल.

या पार्श्वभूमीवर एका अर्थाने कार्यकर्त्यांची 'फॅक्टरी' असलेल्या या उत्सवांना अधिक विधायक आणि रचनात्मक स्वरूप प्राप्त होण्यासाठी विविध मंडळांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्या नियमित प्रशिक्षणाची व्यवस्था असणे गरजेचे आहे. उत्सवांची 'धार्मिक आणि सामाजिक उद्दिष्टे' साध्य करण्यासाठी आणि या माध्यमातून विधायक नेतृत्व घडवण्यासाठी हे प्रशिक्षण उपयोगी ठरेल.

## सत्रांचे विषय

### उत्सवांचा इतिहास

- उत्सवांची ऐतिहासिक परंपरा
- सुरुवात कधी, कशी झाली आणि सार्वजनिक स्वरूप कसे प्राप्त होत गेले ?
- पूर्वकालीन व्यक्ती / नेते / पुढारी यांचे योगदान.
- त्या त्या काळानुसार उद्दिष्टे.

### कार्यक्रम संयोजन

- उत्सवांचे समग्र नियोजन आणि व्यवस्थापन.
- मंडप उभारणी ते मांडव परतणीपर्यंत.
- नावीन्यपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन.
- पावित्र्य, सौंदर्य आणि सौहार्द यांचा विचार करून नियोजन.
- वार्षिक अहवाल.
- प्रसार माध्यमांचे नियोजन.

## उत्सव आणि सामाजिक भान

- उत्सवांतील सामाजिक उपक्रमशीलता.
- सामाजिक प्रबोधन.
- उत्सव आणि सेवाभाव.
- उत्सवांच्या माध्यमातून कार्यकर्त्यांचे संघटन आणि समाजाचेही संघटन.
- सांस्कृतिक कार्यक्रमांचे स्वरूप.
- विधायकता आणि रचनात्मकता.
- पर्यावरणाचे भान.
- समाज मंडळांच्या उत्सवाकडे कसा पाहतो?
- वरील सर्व मुद्दे विविध (अधिक प्रमाणात) उदाहरणांसह.

## आपत्ती व्यवस्थापन

- आपत्ती पूर्व – आपत्ती घडू नये यासाठी तयारी
- आपत्त्योत्तर – कमी नुकसान होण्यासाठी त्वरित प्रतिसाद
- गर्दीचे नियोजन
- प्रदूषण नियंत्रण.
- विमा योजना, शासनाच्या संबंधित योजना.
- नियमावली आणि कायदे

## नियम, कायदे आणि शासनसंबंधित बाबी

- कायदा व सुव्यवस्थेची काळजी घेणे.
- संबंधित नियम व कायदे जाणून घेणे.
- शासनाच्या योजना.
- धर्मादाय आयुक्त कार्यालयासह अन्य शासकीय कार्यालयांशी संपर्क आणि संबंधित बाबींची पूर्तता.

## आर्थिक नियोजन

- निधी, देणगी, वर्गणी, पावत्या... इत्यादी.
- संबंधित करपद्धती.
- हिशेब, लेखा अहवाल (ऑडिट रिपोर्ट).
- दस्तावेजीकरण (Documentation).
- डिजिटल पद्धती.
- रोजगार निर्मिती.

## नेतृत्व विकास

- संघबांधणी (टीम बिल्डिंग)
- मंडळांच्या माध्यमातून सामाजिक आणि राजकीय नेतृत्व विकासाची संधी.

## संपर्क

**विनय वसंत मावळणकर**
वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी
+91 9096548250 | vinaym@rmponweb.org

**अनिल पांचाळ**
साहाय्यक कार्यक्रम अधिकारी
+91 9975415922 | anilp@rmponweb.org

+91 7208070874

**मुंबई कार्यालय (नोंदणीकृत)**
१७, चंचल स्मृती, गं.द.आंबेकर मार्ग,
श्रीराम इंडस्ट्रीयल इस्टेट समोर, वडाळा,
मुंबई – ४०० ०३१, महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी : +९१ – २२ – २४१३ ६९६६ /
२४१८ ५५०२ / २४१५ ६७२५
ई मेल -rmpchanchal@rmponweb.org

**ज्ञान–नैपुण्य केंद्र (प्रशिक्षण संकुल)**
केशव सृष्टी, उत्तन, एस्सेल वर्ल्ड रोड, भाईंदर (पश्चिम)
जि. ठाणे – ४०१ १०६, महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी : +९१ – २२ – २८४५ ०१०१ / २ / ३ / ६
ई मेल -samparka@rmponweb.org